# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.09.2025** **वारःमंगळवार**

1. दिवाळीपूर्वी सरकार शेतकऱ्यांना मदत करेल- महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचं आश्वासन
2. जिल्हा नियोजन समितीचा 10 टक्के निधी अतिवृष्टी, गारपीट किंवा पाणीटंचाईसारख्या परिस्थितीत वापरायला राज्यशासनाची परवानगी
3. अतिवृष्टीमुळे यंदाचा ऊस गाळप हंगाम 25 ऑक्टोबर किंवा 1 नोव्हेंबरपासून सुरु होण्याची शक्यता
4. बारावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षा अर्ज भरण्यासाठी 20 ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ आणि
5. महिला विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात, भारत आणि श्रीलंकेदरम्यान सलामीचा सामना

**बावनकुळे-पंचनामे**

राज्यात अतिवृष्टीमुळं झालेल्या नुकसानीचे पंचनामे या आठवडाअखेर पूर्ण होतील आणि दिवाळीपूर्वी सरकार शेतकऱ्यांना मदत करेल असं आश्वासन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलं. अतिवृष्टीमुळे राज्यात झालेलं नुकसान ही गेल्या 50 वर्षातील सर्वात मोठी आपत्ती असल्याचं त्यांनी सांगितलं. बावनकुळे यांनी काल नागपूर जिल्ह्यातल्या दाढेरा, तिडंगी, तेलगाव, नांदा गोमुख या गावांना भेट दिली. पंचनामे काटेकोरपणे व्हावेत यासाठी महसूल विभागाला आदेश देण्यात आले आहेत. ई - पंचनामे केले जात आहेत. प्रत्येक पंचनामा ग्रामसभेत दाखवणं अनिवार्य केलं असून, अधिकारी थेट शेतात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करत आहेत, असं बावनकुळे यांनी सांगितलं.

**पाऊस**

सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी काल जिल्ह्यातील पूरस्थितीचा आढावा घेतला. गेल्या काही दिवसांपूर्वी झालेली अतिवृष्टी तसंच भीमा आणि सीना नदीला आलेल्या महापूरात 92 गावांमधील शेती, घरदारे, जनावरे आणि गावातल्या सार्वजनिक सुविधांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ओला दुष्काळ लागू करण्याच्या निकषांची माहिती घ्यावी असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

नाशिक जिल्ह्यात काल पाऊस कमी झाल्यानंतर धरणांमधील विसर्ग कमी करण्यात आला आहे. त्यामुळे गोदावरी नदीसह अन्य नद्यांचे पूर ओसरत आहे. दरम्यान, नाशिक शहरातील वडाळा गावातल्या एका घराची भींत कोसळून एक वृध्द ठार झाला. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी नासर्डी नदीची पहाणी करून नदीकाठी संरक्षक भिंत बांधण्याची हमी दिली.

अतिवृष्टीमुळे सातारा जिल्ह्यातल्या म्हसवड परिसरातील शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी काल माण तालुक्यातील गोंदवले बुद्रुक, लोधवडे, पिंपरी आणि म्हसवड इथं नुकसानीची पहाणी केली.

बुलडाणा जिल्ह्यातल्या पूरग्रस्त भागाला केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी भेट देऊन पाहणी केली. अहिल्यानगर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे कर्जत तालुक्यातील मलठण खताळ वस्ती इथं पूरस्थिती निर्माण झाली होती; राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकानं पुरात अडकलेल्या 44 नागरिकांची सुखरूप सुटका केली.

**अतिवृष्टी बाधित**

अतिवृष्टीमुळं राज्यातले 41 हजारांपेक्षा जास्त नागरिक स्थलांतरित झाले असल्याची माहिती राज्य सरकारनं दिली आहे. सर्वाधिक 13 हजारांहून अधिक नागरिक सोलापूरात स्थलांतरित झाले आहेत.

**मदत**

दरम्यान पूरग्रस्तांसाठी राज्यभरातून मदतीचा हात पुढे येत आहे. मुंबईतल्या श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासानं अतिवृष्टीग्रस्तांसाठी 10 कोटींची मदत जाहीर केली आहे. धाराशिवच्या जनता सहकारी बँकेनं तसंच प्रगती सहकारी पतसंस्थेनं देखील पूरग्रस्तांना मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. धाराशिव जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक पूरग्रस्तासाठी एक कोटी सहा लाख रुपयांची मदत देणार आहेत.

**जिल्हा नियोजन समिति**

जिल्हा नियोजन समितीच्या निधीपैकी 10 टक्के निधी अतिवृष्टी, गारपीट किंवा पाणी टंचाई यासारख्या परिस्थितीसाठी वापरण्याची मुभा राज्य सरकारनं दिली आहे. यासंदर्भातला शासन आदेश नियोजन विभागानं काल जारी केला. हा निधी खर्च करण्यासाठी मंजुरी देण्याचे अधिकार पालकमंत्र्यांना असतील आणि त्यानंतर होणाऱ्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत त्याला मान्यता घ्यावी लागेल.

**मुख्यमंत्री-यवतमाळ**

राज्यात सध्या पूरस्थितीमुळे शेतीची भीषण अवस्था झाली आहे, वातावरण बदलालाही शेतकरी तोंड देत आहेत. शेतकऱ्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी सरकार निश्चितच प्रयत्न करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. ते काल यवतमाळ इथं दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या वतीनं आयोजित दीनदयाल जयंती समारंभात बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी प्रतिष्ठानच्या परिसरात असलेल्या विविध प्रकल्पांची पाहणी केली. मुख्यमंत्र्यांनी यवतमाळ शहरातल्या अवधूतवाडी पोलीस ठाण्याला भेट देऊन तिथल्या व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी पोलीस प्रशासनानं पूरग्रस्तांच्या मदतीसाठी 27 लाख 11 हजार 111 रुपयांच्या निधीचा धनादेश त्यांना दिला.

**ऊस गाळप**

राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे यंदाचा ऊस गाळप हंगाम आता 25 ऑक्टोबर किंवा 1 नोव्हेंबरपासून सुरु होण्याची शक्यता आहे. यासंदर्भात मंत्री समितीची बैठक होणार असून यात यंदाच्या गाळप हंगामाचे धोरण निश्चित केले जाणार आहे. कृषी विभागानं दिलेल्या माहितीनुसार 12 ते 13 लाख हेक्टरवर ऊसाची लागवड झाली आहे. त्यामधून साखर कारखान्यांना गाळपासाठी 1200 ते 1250 लाख मेट्रिक टन ऊस उपलब्ध होईल, असा अंदाज आहे.

**मुदत वाढ**

राज्य परीक्षा मंडळाने बारावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षा अर्ज भरण्यासाठी 20 ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात झालेली अतिवृष्टी आणि त्यामुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना परिक्षा अर्ज भरण्यास अडचण येत आहे. यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना दूरध्वनी करून मुदतवाढ देण्याबाबत निर्देश दिले.

**सेवापर्व-राष्ट्रीय शिक्षण धोरण**

सेवा आणि सुशासन, हा मंत्र समोर ठेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार देशात परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. सेवा पर्व या विशेष मालिकेत आज ऐकुया केंद्र सरकारनं जाहीर केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 बाबत माहिती....

**देशाच्या भावी पिढीला घडवण्याचं, त्यांच्या मनांना आकार देण्याचं काम शिक्षणातून होतं, त्यामुळे शिक्षण हा राष्ट्राच्या भवितव्याचा पाया आहे. याच दृष्टिकोनातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं जून 2020मध्ये, राष्ट्रीय शिक्षण धोरण जाहीर केलं. 34 वर्षानंतर भारताच्या शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करणाऱ्या या शिक्षण धोरणात 21व्या शतकासाठी आवश्यक असलेल्या घटकांचा प्राधान्यानं समावेश करण्यात आला आहे. याबाबत बोलताना पंतप्रधान म्हणतात.....**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात कौशल्य विकासावर भर देण्यात आला असून शालेय आणि उच्च शिक्षणात कौशल्य प्रशिक्षण अंतर्भूत करण्यात आलं आहे. माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची ओळख करून देणं, भारतीय भाषांचा समावेश करून बहुभाषिकतेला प्रोत्साहन देणं, पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्रावर भर ही राष्ट्रीय शिक्षण धोरणाची ठळक वैशिष्ट्ये आहेत. देशाच्या भावी पिढीमध्ये आत्मविश्वास आणि जिज्ञासा वृद्धिंगत करून त्यांच्या क्षमतांचा विकास होण्याच्या दृष्टीनं**

**हे धोरण तयार करण्यात आलं आहे. एका अर्थानं राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 नं भारतात अधिक समावेशी, विद्यार्थी-केंद्रित आणि भविष्यानुकूल शिक्षण प्रणालीचा पाया रचला आहे.**

**धम्मचक्र प्रवर्तन-नागपूर**

एकोणसत्तराव्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आजपासून नागपूर मधल्या दीक्षाभूमीवर कार्यक्रम सुरू होत आहेत. भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या वतीनं आज बौद्ध धम्माची दीक्षा देण्यात येणार आहे. तसंच देश परदेशातील बौद्ध भिक्खूंच्या उपस्थितीत धम्म परिषद होणार आहे. 2 ऑक्टोबरला होणाऱ्या मुख्य कार्यक्रमात अध्यक्षस्थानी डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जून ससाई तर प्रमुख पाहुणे म्हणून धम्म लर्निंग सेंटर सारनाथचे भदंत चंदीमा थेरो उपस्थित राहणार आहेत. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी लाखों अनुयायी नागपूरमध्ये येतेत. त्या पार्श्वभूमीवर नांदेड-नागपूर आणि पुणे-नागपूर अशा दोन विशेष रेल्वेगाड्या सोडण्याचा निर्णय दक्षिण मध्य रेल्वेने घेतला आहे.

**संविधान यात्रा नागपूर**

नागपूरमधल्या दीक्षाभूमी पासून सेवाग्राम आश्रमापर्यंतच्या संविधान सत्याग्रह पदयात्रेला काल महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरुवात झाली. संविधान वाचवण्यासाठी आणि भारतीय नागरितत्वाला पाठबळ देण्यासाठी ही सत्याग्रह यात्रा काढण्यात आल्याचं त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**महिला क्रिकेट**

आयसीसी महिला विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात होत आहे. 50 षटकांच्या सामन्यांच्या या स्पर्धेतला पहिला सामना आज भारत आणि श्रीलंका संघांमध्ये गुवाहाटी इथं खेळला जाईल. भारत आणि श्रीलंका या यजमान देशांसह ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड, दक्षिण अफ्रिका, बांग्लादेश आणि पाकिस्तानच्या महिला संघांमध्ये प्राथमिक फेरीचे 28 सामने होतील.

**हवामान**

येत्या दोन दिवसात, कोकणात बहुतांश ठिकाणी, विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.